दै. देशोन्नती दि. 15.05.25

# वजिराबाद व इतवारा वाहतूक शाखेची ऑटो चालकांविरुद्ध कारवाया

## ६ लाख ४२ हजारांचा दंड आकारला



देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** शहर वाहतूक शाखा वजिराबाद व इतवारा यांची अवैध प्रवाशी वाहतूक, विना वाहन परवाना चालणारी वाहने, गणवेश परिधान न करणारे ऑटोचालकावर धडक कारवाई करून ६ लाख ४२ हजार २५० रूपयाचा दंड आकारलाआहे.

पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी शहरात वाढत असलेली वाहतूक समस्या अटोक्यात आणण्यासाठी दिलेल्या आदेशावरून शहरात चालणारी अवैध प्रवाशी वाहतूक तसेच विना परवाना,परमिट चालणारे वाहणे, भरधाव वेगाने चालणारी वाहने व गणवेश परिधान न करणारे ऑटो चालकांवर चालक कार्यवाही करण्याची मोहीम राबविणे बाबत शहर वाहतूक शाखा वजिराबाद व इतवारा पोलिसांनी १३ मे रोजी प्रभारी अधिकारी वजिराबाद शाखेचे पोनि साहेबराव गुट्टे यांनी सिटीबी स्टाफ, दंगल नियंत्रण पथकातील पोलीस अंमलदार यांच्यासोबत कारवाई केली. यामध्ये २५ पेड केसेस करून २५ लाख २२ हजार २५० रूपयाचा दंड, ऑनलाईन युपीआयव्दारे केसेसद्वारे ५३ हजार २०० रुपये , ३२२ अनपेड केसेस करून ३ लाख ६१ हजार रुपये , ७ ट्रिपल सिटच्या केसेस करून ७ रुपये , गणवेश परीधान न करणाऱ्या २९० चालकांवर केसेस करून १ लाख ६४ हजार रुपये असा एकुण ५४९ केसेस करून ५ लाख ५७ हजार ४५० रूपयाचा दंड आकारण्यात आला.

तसेच इतवारा शाखेचे पोनि जगन्नाथ पवार यांनी पथकासह विविध ठिकाणी वाहणाची कागदपत्रे तपासणी केली दरम्यान कागदपत्र नसल्यामुळे, गणवेश परिधान न करणारे ऑटो चालक, तसेच विना परवाना चालणारे वाहन, अवैध प्रवाशी वाहतूक व इतर एकुण ६७ केसेस करून एकुण ८४ हजार ८०० रूपयाचा दंड आकारला. दोन्ही शाखेने एकंदरीत ६१६ केसेस करून एकुण ६ लाख ४२ हजार २५० रुपयांचा दंड आकारला.